MHND060012452017

दाखल दिनांक : २९.१२.२०१७
नोंदणी दिनांक : २९.१२.२०१७
न्याय निर्णय दिनांक: ०४.१०.२०१९
कालावधी : **०१ व. ०९ म. ०५ दि.**

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बिलोली, ता. बिलोली, जि. नांदेड यांचे न्यायालयात...

(पिठासन अधिकारी श्री. डी.आर. देशपांडे)

भुसंपादन निर्देश अर्ज क्र. ६५/२०१७

निशाणी क्र. ३८

महेंद्र शामलाल जयस्वाल, **मयत**

१/अ श्रीमती सारिका भ्र. महेंद्र जयस्वाल,
वय : ४२ वर्ष, व्यवसाय : घरकाम व शेती, राहणार : मुतन्याळ,
ता. धर्माबाद, जि. नांदेड.
सध्या कुंभार गल्ली, येताळा,
ता. धर्माबाद, जि. नांदेड.

१/ब अक्षय महेंद्र जयस्वाल,
वय : २२ वर्ष, व्यवसाय : शिक्षण,
राहणार : मुतन्याळ,
ता. धर्माबाद, जि. नांदेड.
सध्या कुंभार गल्ली, येताळा,
ता. धर्माबाद, जि. नांदेड.

२ संजय शामलाल जयस्वाल,
वय : सज्ञान, व्यवसाय : शेती,

३ नविन शामलाल जयस्वाल,
वय : सज्ञान, व्यवसाय : शेती,
राहणार : मुतन्याळ,
ता. धर्माबाद, जि. नांदेड.
सध्या येताळा,
ता. धर्माबाद, जि. नांदेड. **...अर्जदार.**

<u>**विरूध्द**</u>

१. महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी,
नांदेड, ता. व जि. नांदेड.

२. उपजिल्हाधिकारी, भुमि अभिलेख,
पी.टी.एम.आय.डब्ल्यू. क्र. १ नांदेड,
ता. व जि. नांदेड.

३. उर्ध्व पैनगंगा प्रोजेक्ट डिव्हीजन क्र. ६,
द्वारा कार्यकारी अभियंता,
चैतन्य नगर, नांदेड,
ता. व जि. नांदेड. **.....गैरअर्जदार.**

वादी यांचे तर्फे वकील	:	श्री. जी.बी. हांडे
प्रतिवादी क्र. १ व २ यांचे तर्फे वकील	:	श्री. एस.बी. कुंडलवाडीकर
प्रतिवादी क्र. ३ यांचे तर्फे वकील	:	श्री. ए.एस. वाघमारे

MHND060000502018

दाखल दिनांक : १७.०१.२०१८
नोंदणी दिनांक : १७.०१.२०१८
न्याय निर्णय दिनांक: ०४.१०.२०१९
कालावधी : **०१ व. ०८ म. १७ दि.**

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बिलोली, ता. बिलोली, जि. नांदेड यांचे न्यायालयात...

(पिठासन अधिकारी श्री. डी.आर. देशपांडे)

भुसंपादन निर्देश अर्ज क्र. ०१/२०१८

निशाणी क्र. ३३

पोतन्ना भोजन्ना चांदोड, **मयत**

१/अ श्रीमती राजुबाई भ्र. पोतन्ना चांदोड,
वय : सज्ञान, व्यवसाय : घरकाम व शेती,
राहणार : येताळा,
ता. धर्माबाद, जि. नांदेड.

१/ब दत्तु पोतन्ना चांदोड,
वय : सज्ञान, व्यवसाय : घरकाम,
राहणार : येताळा,
ता. धर्माबाद, जि. नांदेड.

१/क अंशाबाई भ्र. भोजारेड्डी मकलोड,
वय : सज्ञान, व्यवसाय : घरकाम व शेती,
राहणार : गणुरा, ता. मुधोळ,
जि. अदिलाबाद (आंध्रप्रदेश)

१/ड लक्ष्मीबाई देविदास मकलोड,
वय : सज्ञान, व्यवसाय : घरकाम व शेती,
राहणार : त्रीमनपल्ली, ता. डिचपल्ली,
जि. निजामाबाद (आंध्रप्रदेश)

१/इ सुनिता भ्र. दिगांबर बुरलोड,
वय : सज्ञान, व्यवसाय : घरकाम व शेती,
राहणार : बेंम्बार, ता. मुधोळ,
जि. अदिलाबाद (आंध्रप्रदेश) **...अर्जदार.**

विरूध्द

१. महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी,
नांदेड, ता. व जि. नांदेड.

२. उपजिल्हाधिकारी, भुमि अभिलेख,
पी.टी.एम.आय.डब्ल्यू. क्र. १ नांदेड,
ता. व जि. नांदेड.

३. उर्ध्व पैनगंगा प्रोजेक्ट डिव्हीजन क्र. ६,
द्वारा कार्यकारी अभियंता,
चैतन्य नगर, नांदेड,
ता. व जि. नांदेड. **.....गैरअर्जदार.**

वादी यांचे तर्फे वकील	:	श्री. जी.बी. हांडे
प्रतिवादी क्र. १ व २ यांचे तर्फे वकील	:	श्री. एस.बी. कुंडलवाडीकर
प्रतिवादी क्र. ३ यांचे तर्फे वकील	:	श्री. ए.एस. वाघमारे

MHND060012412017

दाखल दिनांक : २९.१२.२०१७
नोंदणी दिनांक : २९.१२.२०१७
न्याय निर्णय दिनांक: ०४.१०.२०१९
कालावधी : **०१ व. ०९ म. ०५ दि.**

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बिलोली, ता. बिलोली, जि. नांदेड यांचे न्यायालयात...

(पिठासन अधिकारी श्री. डी.आर. देशपांडे)

भुसंपादन निर्देश अर्ज क्र. ६३/२०१७

निशाणी क्र. २९

नागोराव सिद्राम मोरे,
वय : सज्ञान, व्यवसाय : शेती,
राहणार : मुतन्याळ, ता. धर्माबाद,
जि. नांदेड.
सध्या बाभुळगांव, ता. धर्माबाद, जि. नांदेड.

...अर्जदार.

<u>विरूध्द</u>

१. महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी,
नांदेड, ता. व जि. नांदेड.

२. उपजिल्हाधिकारी, भुमि अभिलेख,
पी.टी.एम.आय.डब्ल्यू. क्र. १ नांदेड,
ता. व जि. नांदेड.

३. उर्ध्व पैनगंगा प्रोजेक्ट डिव्हीजन क्र. ६,
द्वारा कार्यकारी अभियंता,
चैतन्य नगर, नांदेड,
ता. व जि. नांदेड. .....**गैरअर्जदार.**

वादी यांचे तर्फे वकील	:	श्री. जी.बी. हांडे
प्रतिवादी क्र. १ व २ यांचे तर्फे वकील	:	श्री. एस.बी. कुंडलवाडीकर
प्रतिवादी क्र. ३ यांचे तर्फे वकील	:	श्री. ए.एस. वाघमारे

<u>न्यायनिर्णय</u>

(जाहीर दिनांक ०४ ऑक्टोबर २०१९)

भुसंपादन कायदा कलम १८ प्रमाणे संपादित जमीनीची योग्य मावेजा रक्कम ठरवुन मिळावी यासाठी प्रस्तुत तीन प्रकरणे दाखल करण्यात आलेली आहेत. सदरील तिन्ही प्रकरणे हे इसापुर उजव्या कालव्याच्या पुच्छ कालव्यावरून निघणारा धर्माबाद शाखा कालवाचे असल्यामुळे त्यांचे एकत्रीतरित्या संयुक्तपणे निर्णीत करण्यात येत आहेत.

प्रकरणाची संक्षीप्त हकीकत पुढीलप्रमाणे आहे.

२. मौजे मुतन्याळ, ता. धर्माबाद, जि. नांदेड येथील गट क्र. ३४ मधील संपादित करण्यात आलेले क्षेत्र ०० हेक्टर ३८ आर, गट क्र. ३८ मधील संपादित करण्यात आलेले क्षेत्र ०० हेक्टर ६१ आर आणि गट क्र. २३ मधील

संपादित करण्यात आलेले क्षेत्र ०० हेक्टर ६३ आर हे या अर्जाचे वाद विषय आहेत. त्यास संक्षेपाने 'विवाद्य मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.

३. इसापुर उजव्या कालव्याच्या पुच्छ कालव्यावरून निघणारा धर्माबाद शाखा कालवा चे मातीकाम, बांधकाम व अस्तरीकरणाची कामे मौजे मुतन्याळ, ता. धर्माबाद यासाठी विवाद्य मिळकत संपादित करण्यात आलेली आहे. उपजिल्हाधिकारी, विशेष भूसंपादन अधिकारी, एम.आय.डब्ल्यू. नांदेड नुकसान भरपाईच्या पुनर्वितरणासाठी तसेच नुकसान भरपाईच्या रकमेमध्ये वाढ करण्यासाठी सध्याचे प्रस्तुत प्रकरणे दाखल करण्यात आलेले आहेत. अर्जदार हे सदर मिळकतीचे मालक आहेत. त्यामुळे ते मिळकतीच्या संपादनाचा बाजार मुल्याप्रमाणे वाढीव व योग्य मावेजा मिळण्यास पात्र आहेत.

४. मावेजा रक्कम ठरवण्यापुर्वी गैरअर्जदार यांनी अर्जदार यांना कोणताही पुरावा देण्याची संधी दिली नाही. चौकशीसाठी तारीख नेमली नाही. अर्जदार यांचे अपरोक्ष त्यांना त्यांची बाजू मांडण्याची कोणतीही संधी न देता सदर मावेजाबाबत अवॉर्ड तयार करण्यात आलेले आहे.

५. गैरअर्जदार यांनी संपादित जमीनीची मावेजा किंमत अनुक्रमे रूपये ६,००,०००/—, रूपये ४,८०,०००/— आणि रूपये ६,००,०००/— प्रति हेक्टर अशी ठरवली आहे. संपादित जमीनीची योग्य बाजार मुल्याप्रमाणे किंमत ठरवण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रस्तुत निर्देश अर्ज दाखल करण्यात आलेले आहेत.

६. गैरअर्जदार यांनी विवाद्य जमीनीचा ताबा अर्जदार यांचे संमतीशिवाय घेतलेला आहे. ताबा घेतेवेळी अर्जदार यांना मावेजा रक्कम दिलेली नाही. त्यामुळे भुसंपादन कायदा कलम ३४ प्रमाणे व्याज मिळवण्यास अर्जदार हे पात्र आहेत.

७. संपादित जमीन ही धर्माबाद या तालुका ठिकाणापासुन ६ ते ७ कि.मी. अंतरावर आहे. मुतन्याळ गावाजवळून धर्माबाद—उमरी हा तालुका मुख्य रस्ता जातो. मुतन्याळ येथे एस.टी. बसेस सुविधा तसेच ग्रामपंचायत, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहे. शेतक—यांसाठी क्रेडिट को—ऑपरेटीव्ह सोसायटी आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रची सुविधा उपलब्ध आहे. संपादित जमीनीपासून धर्माबाद रेल्वे सीानक ५ कि.मी. अंतरावर आहे. तसेच पेट्रोल पंप, कॉलेज तसेच सरकारी कार्यालये संपादित जमीनीपासून जवळ आहेत. ह्या सर्व सुविधा असल्यामुळे जमीनीचा दर जास्त आहे. सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे. संपादित जमीनीतुन उपरोक्त सर्व अर्जदार हे गहु, ज्वारी, कापुस, तुर, मुग, शेंगदाणे, मिरची, सोयाबिन, सुर्यफुल, धान वगैरे पिके घेतात. त्यातुन त्यांना खर्च वजा जाता दरसाल सुमारे रक्कम रूपये २५,०००/— ते ३०,०००/— प्रति एकर उत्पन्न मिळते.

८. अर्जदार यांचे मते विवाद्य मिळकतीची किंमत बाजार मुल्याप्रमाणे जास्त आहे. निर्देश अर्ज भुसंपादन अधिकारी, नांदेड यांचेकडे मुदतीत दाखल केलेला आहे. त्यानंतर सदर प्रकरण हे न्याय्य चौकशीसाठी न्यायालयात

पाठवण्यात आलेले आहे.

९. अर्ज क्र. ६५/२०१७ मध्ये गैरअर्जदार क्र. ३ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. १३ अन्वये नमुद केले आहे. गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी नि.क्र. १४ प्रमाणे अर्जास त्यांचे म्हणणे गैरअर्जदार क्र. ३ यांच्या म्हणण्याप्रमाणे असल्याचे नमुद केले आहे. गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी नि.क्र. ३७ प्रमाणे आणि गैरअर्जदार क्र. ३ यांनी नि.क्र. ३६ प्रमाणे पुरावाबंद पुरसिस दिली.

१०. अर्ज क्र. ०१/२०१८ मध्ये गैरअर्जदार क्र. ३ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. १७ अन्वये नमुद केले आहे. गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी नि.क्र. १८ प्रमाणे अर्जास त्यांचे म्हणणे गैरअर्जदार क्र. ३ यांच्या म्हणण्याप्रमाणे असल्याचे नमुद केले आहे. गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी नि.क्र. ३२ प्रमाणे आणि गैरअर्जदार क्र. ३ यांनी नि.क्र. ३१ प्रमाणे पुरावाबंद पुरसिस दिली.

११. अर्ज क्र. ६३/२०१७ मध्ये गैरअर्जदार क्र. ३ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. १३ अन्वये नमुद केले आहे. गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी नि. क्र. १४ प्रमाणे अर्जास त्यांचे म्हणणे गैरअर्जदार क्र. ३ यांच्या म्हणण्याप्रमाणे असल्याचे नमुद केले आहे. गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी नि.क्र. २८ प्रमाणे आणि गैरअर्जदार क्र. ३ यांनी नि.क्र. २८ प्रमाणे पुरावाबंद पुरसिस दिली.

१२. गैरअर्जदार यांनी विवाद्य मिळकत संपादित केल्याचे मान्य केले आहे. त्या मिळकतीचा ताबा नियमाप्रमाणे घेण्यात आलेला आहे. नुकसान भरपाईची रक्कम ठरवताना जमीनीची प्रत, बाजारभाव वगैरे सर्व बाबींचा योग्य विचार

करण्यात आलेला आहे. संपादित जमीनीतुन अर्जदार हे दरवर्षी रक्कम रूपये २५,०००/— ते ३०,०००/— प्रति एकर उत्पन्न घेत होते ही बाब गैरअर्जदार यांनी नाकारलेली आहे. संपादित जमीनीचा योग्य मावेजा देण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरण नामंजुर करण्यात यावे असे त्यांनी नमुद केले.

१३.　　उपरोक्त तीन्ही प्रकरणातील अर्जदार यांचे वकील श्री. जी.बी. हांडे, गैरअर्जदार क्र. १ व २ यांचे सरकारी वकील श्री. एस.बी. कुंडलवाडीकर आणि गैरअर्जदार क्र. ३ यांचे वकील श्री. ए.एस. वाघमारे यांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाच्या अंतिम व योग्य निर्णयासाठी पुर्वीचे मा. पिठासन अधिकारी यांनी अनुक्रमे नि.क्र. १५, नि.क्र. १९ आणि नि.क्र. १५ प्रमाणे निश्चीत केलेले मुद्दे पुन्हा या ठिकाणी मी देत आहे. त्यावरील माझे निष्कर्ष मी पुढील कारण मिमांसेनुसार नोंदवत आहे.

मुद्दे	निष्कर्ष
१. संपादित जमीनची अवॉर्ड आधारे दिलेली भरपाई रक्कम ही अपुरी व अयोग्य आहे ही बाब सर्व अर्जदार यांनी सिध्द केलेली आहे काय ?	**...होय.**

२. उपरोक्त तीन्ही अर्जातील सर्व अर्जदार हे वाढीव मावेजा रक्कम मिळवण्यास पात्र आहेत काय ? असल्यास किती ?	**होय, अवॉर्डमध्ये दिलेल्या विक्री मुल्यावर ३० टक्के वाढ मिळवण्यास सदरील तीन्ही अर्जातील सर्व अर्जदार पात्र आहेत.**
३. अंतिम आदेश कोणता ?	**तीनही अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहेत.**

कारणमिमांसा

१४. अर्जातील कथने सिध्द करण्यासाठी अर्ज क्र. ६५/२०१७ मधील अर्जदार संजय शामलाल जयस्वाल यांनी अर्जदार यांचे साक्षीदार क्र. १ यांचा साक्षी पुरावा नि.क्र. २८ प्रमाणे आहे. त्यामध्ये त्यांनी अर्ज नि. क्र. १ मधील सर्व मजकुर कथन केलेला आहे.

१५. अर्जातील कथने सिध्द करण्यासाठी अर्ज क्र. ०१/२०१८ मधील अर्जदार दत्तु पोतन्ना चांदोड यांनी अर्जदार यांचे साक्षीदार क्र. १ यांचा साक्षी पुरावा नि.क्र. २३ प्रमाणे आहे. त्यामध्ये त्यांनी अर्ज नि. क्र. १ मधील सर्व मजकुर कथन केलेला आहे.

१६. अर्जातील कथने सिध्द करण्यासाठी अर्ज क्र. ६३/२०१७ मधील अर्जदार नागोराव सिदराम मोरे यांनी अर्जदार यांचे साक्षीदार क्र. १ यांचा साक्षी पुरावा नि.क्र. १९ प्रमाणे आहे. त्यामध्ये त्यांनी अर्ज नि. क्र. १ मधील सर्व मजकुर कथन केलेला आहे.

१७. या व्यतिरिक्त प्रस्तुत अर्जातील अर्जदार यांनी मौजे बाभुळगाव, ता.

धर्माबाद येथील दुसरी शेत जमीन गट क्र. ९४ चे दि. ०६.०२.२०१२ रोजीचे खरेदीखत अनुक्रमे नि.क्र. ३१, २६ आणि २३ , अंतिम निवाडा झेरॉक्स प्रत नि. क्र. ३३, २८ व २४ आणि भूसंपादन कायदा कलम ४ प्रमाणे निवाडा विवरणपत्र 'इ' ची झेरॉक्स प्रत नि.क्र. ३४, २९ आणि २५ इत्यादी कागदोपत्री पुराव्यांवर अर्जदार यांनी भरवसा ठेवला. अर्जदार यांनी आपला साक्षी पुरावा अनुक्रमे नि.क्र. ३५, ३० आणि २६ प्रमाणे संपवला.

१८. उपरोक्त तीन्ही प्रकरणामध्ये गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी कोणीही साक्षीदार यांची शपथेवर साक्ष नोंदवली नाही. तसेच कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

१९. उपरोक्त तीन्ही प्रकरणात देण्यात आलेला साक्षी पुरावा व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. त्यानुसार निश्चीत केलेल्या वाद मुद्द्यांची स्पष्टीकरणात्मक चर्चा मी पुढीलप्रमाणे करत आहे.

<u>मुद्दा क्र. १ बाबत</u> :

२०. संपादित जमीनीची देण्यात आलेली मावेजा रक्कम अयोग्य व अपुरी आहे असे अर्जदार यांचे कथन आहे. अर्जदार संजय जयस्वाल, दत्तु पोतन्ना चांदोड, आणि नागोराव सिदराम मोरे यांचे साक्षीदार क्र. १ यांनी न्यायालयासमोर शपथेवर सदर बाब नमुद केलेली आहे.

२१. अंतिम निवाडाची झेरॉक्स प्रत अनुक्रमे नि.क्र. ३३, २८ आणि २४

चे अवलोकन केले. त्यामध्ये संपादित विवाद्य मिळकत मध्ये अहवालाप्रमाणे झाडे व विहीरीचा समावेश असल्याचे स्पष्टपणे नमुद केलेले आहे. परंतु, सदरील संपादित जमीनीमध्ये उभी झाडे व फळझाडे होती यासाठी अर्जदार यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही.

२२. अंतिम निवाडा नि.क्र. ३३, २८ आणि २४ प्रमाणे देण्यात आलेल्या जमीनी ह्या इसापूर कालव्याच्या पुच्छ कालव्या वरून निघाणारा धर्माबाद शाखा कालवा मौजे मुतन्याळ, ता. धर्माबाद या प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी दिलेला मावेजा वाढवुन मिळावा यासाठी त्यांनी प्रस्तुत प्रकरण दाखल केलेले होते. अंतिम निवाडा नि.क्र. ३३, २८ आणि २४ मध्ये त्या जमीनी संपादित केल्या होत्या असे दिसून येते.

२३. अर्जदार यांनी दिलेल्या सदर पुराव्यास बाधा येईल यासाठी गैरअर्जदार यांनी कोणताही पुरावा दिलेला नाही. अवॉर्ड नि.क्र. ३३, २८ आणि २४ प्रमाणे संपादित जमीनीचे बाजार मुल्य प्रती प्रस्तुत अर्जामध्ये अनुक्रमे हेक्टरी रू. ५,६९,०००/—, रू. ५,५४,०००/— आणि रू. ५,६४,०००/— प्रमाणे ठरवण्यात आलेले आहेत. न्यायालयाने वाढीव मावेजा याच अवॉर्डमधील इतर शेतकरी यांना दिलेला आहे. त्यामुळे संपादित जमीनीचा अर्जदार यांना दिलेला मावेजा हा अपुरा आहे असे मी नमुद करतो. त्यानुसार मुद्दा क्र. १ चे उत्तर मी होकारार्थी देतो.

मुद्दा क्र. २ बाबत :

२४. तसेच उपरोक्त सर्व अर्जदार यांनी मौजे बाभुळगाव, ता. धर्माबाद, जि. नांदेड येथील शेत जमीन गट क्र. ९४ क्षेत्र ३० आर च्या दि. ०६ फेब्रुवारी २०१२ रोजीच्या खरेदीखताची झेरॉक्स प्रत खरेदीखत अनुक्रमे नि.क्र. ३१, २६ आणि २३ प्रमाणे दाखल केलेली आहे. त्या खरेदीखतानुसार ३० आर क्षेत्र रक्कम रूपये १०,००,०००/— या किंमतीस विक्री करण्यात आलेले आहे. त्यानुसार त्या जमीनीचा बाजारभाव दि. ०६.०२.२०१२ रोजी प्रती हेक्टर **रूपये ३३,३३,३३३/—** आहे असे दिसून येते. परंतु मुतन्याळ गावातील एकही खरेदी व्यवहार अर्जदार यांनी न्यायालयासमोर आणला नाही व न आणण्याचे कारण स्पष्ट केले नाही. सबब, उपरोक्त खरेदी व्यवहाराचा अर्जदारास फायदा देता येणार नाही.

२५. तरी देखील एकूण परिस्थितीत संपादित जमीनीचा दिलेला मावेजा हा बाजार मुल्याप्रमाणे योग्य देण्यात आलेला नाही असे अर्जदार यांनी सिध्द केलेले आहे. त्यामुळे वाढीव मावेजा मिळवण्यास सर्व अर्जदार हे पात्र आहेत.

२६. याच प्रकल्पातील मौजे मुतन्याळ, ता. धर्माबाद, जि. नांदेड या गावातील संपादित जमीनीचा योग्य बाजार मुल्याप्रमाणे नुकसान भरपाई रक्कम देण्यात यावी यासाठी इतर प्रकल्पबाधीत व्यक्ती यांनी न्यायालयात प्रकरण दाखल केले होते. भूसंपादन संदर्भ निकाली काढण्यासाठी पूर्वी दिलेल्या निवाडा रक्कम ३० टक्के वाढ देऊन लोकअदालतीत निकाली काढणे मध्ये संमती

देण्याचे शासनाचे धोरण आहे. अर्जदार यांना संपादित जमीनीची मावेजा रक्कम ही बाजार मुल्याप्रमाणे योग्य मिळालेली नाही. वाढीव मावेजा रक्कम मिळवण्यास अर्जदार हे पात्र आहेत असे अर्जदार यांनी सिध्द केलेले आहे. उपरोक्त धोरणाचा विचार करता अर्जदार हे उपरोल्लेखित निवाडा मावेजात ३० टक्के वाढीस पात्र आहेत असे नमूद करण्यात येते. संपादित जमीनीचे बाजारमुल्य हे ३० टक्के प्रती हेक्टर वाढवुन देणे योग्य राहील. त्यामुळे ३० टक्के प्रती हेक्टर वाढवुन दराने अर्जदार यांना नुकसान भरपाई देणे न्यायाचे दृष्टीने योग्य आहे. त्यामधुन पुर्वी दिलेली मावेजा रक्कम वजा करण्यात यावी.

२७. पुर्वीच्या प्रकरणात दिलेल्या न्यायनिवाडा नुसार अर्जदार हे वाढीव बाजारमुल्य वर भुसंपादन कायदा कलम २३(२) प्रमाणे ३० टक्के दिलासा रक्कम तसेच कलम २३(१अ) प्रमाणे १२ टक्के अतिरिक्त घटक रक्कम मिळवण्यास पात्र राहतील. वाढीव मावेजा रक्कम वसुल होईपर्यंत भुसंपादन कायदा कलम २८ प्रमाणे विवाद्य मिळकत संपादित दिनांकापासुन अवॉर्ड दिनांकापर्यंत ९ टक्के आणि त्यानंतर वाढीव मावेजा रक्कम मिळेपर्यंत १५ टक्के व्याज मिळवण्यास अर्जदार हे पात्र राहतील असे निर्देश देणे समानतेच्या तत्वाचे दृष्टीने योग्य व न्यायाचे आहे. त्यानुसार मी मुद्दा क्र. २ चे उत्तर देत आहे.

<u>मुद्दा क्र. ३ बाबत</u> :

२८. अनुषंगाने मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष अभिलिखित करण्यात आलेले आहेत. त्यामुळे मुद्दा क्र. ३ चे उत्तराकरीता मी पुढीलप्रमाणे आदेश देत

आहे.

आदेश

१. उपरोक्त तीनही अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहेत.

२. गैरअर्जदार यांनी संयुक्त व पृथकपणे उपरोक्त तीन्ही अर्जातील सर्व अर्जदार यांना संपादित जमीनीची पूर्वी दिलेली मावेजा रकमेत (किंमतीत) ३० टक्के प्रति हेक्टर प्रमाणे वाढ द्यावी. पुर्वी दिलेली मावेजा रक्कम ही वजावटीस पात्र राहील.

३. गैरअर्जदार यांनी संयुक्त व पृथकपणे उपरोक्त तीन्ही अर्जदार यांना भुसंपादन कायदा, १८९४ मधील मावेजा रकमेवरील व्याज व दिलासा संदर्भातील तरतुदींन्वये व्याज व दिलासा रक्कम द्यावी.

४. वाढीव मावेजा रकमेवर उपरोक्त तीन्ही अर्जदार यांनी नियमाप्रमाणे आवश्यक ती कोर्ट फी द्यावी.

५. उपरोक्त तीन्ही अर्जदार यांनी नियमाप्रमाणे कोर्ट फी दिल्यानंतर अवॉर्ड तयार करण्यात यावे.

६. प्रकरणाचे खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

{न्यायनिर्णय सर्वांसमक्ष खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला}

दिनांक ०४ ऑक्टोबर २०१९

(डी.आर. देशपांडे)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
बिलोली,

Dictated on : 04-10-2019
Transcribed on : 04-10-2019
checked on : 23-10-2019
Signed on : 23-10-2019

दिनांक २३ ऑक्टोबर २०१९ **(डी.आर. देशपांडे)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बिलोली,

<u>प्रमाणपत्र</u>

मी नमुद करतो की, पी.डी.एफ करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील/आदेशामधील संपुर्ण मजकुर हा मुळ न्यायनिर्णय/आदेश प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव	:	एम.एफ.एम. सय्यद
पिठासन अधिकारी यांचे नाव व पदनाम	:	श्री. डी.आर. देशपांडे दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बिलोली
आदेश दिनांक	:	०४.१०.२०१९.
आदेशावर पिठासीन अधिकारी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक	:	.१०.२०१९.
आदेश अपलोड केल्याचा दिनांक	:	.१०.२०१९.